
# 'विद्यापीठ उभारून मराठीची स्थिती बदलणार नाही'

**मराठी ही व्यवहाराची भाषा होत नाही, त्यात संशोधन होणार नाही, तोपर्यंत काही होणार नाही. त्यासाठी मराठी माणसाची सांस्कृतिक अस्मिता जागृत झाली पाहिजे. ही आमची भाषा आहे, आमची जीवन पद्धती आहे, असे मराठी माणसाला वाटत नाही, तोपर्यंत महाराष्ट्रात बदल होऊ शकत नाही, असे परखड मत साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झालेले ख्यातनाम ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी मांडले. आशीष चौधरी यांनी त्यांच्याशी साधलेला संवाद...**



**'विंदांचे गद्यरूप'ला पुरस्कार जाहीर झाला. काय सांगाल, काय भावना आहेत?**

साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला याचा मला आनंदच आहे. त्या आनंदामागचे मुख्य कारण असे की, सरकारने स्थापन केलेल्या साहित्य अकादमी या स्वायत्त संस्थेचा हा पुरस्कार आहे. महाराष्ट्रातील फार मोठे समीक्षक, विचारवंत यांना हा पुरस्कार मिळाला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बा. सी. मर्ढेकर, प्रभाकर पाध्ये असे महाराष्ट्रातील विद्वान या पुरस्काराचे मानकरी राहिलेले आहेत. त्यांच्या पंक्तीत मीही जाऊन बसलो आहे, याचे मला अतिशय समाधान, एक आनंद आहे.

**मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याबाबत काय सांगाल?**

अभिजात भाषेचा दर्जा याचा काहीही परिणाम होणार नाही. मराठी माध्यमाच्या शाळा विकसित होणार नाहीत. मराठी भाषेतून शिक्षण, मराठी ही व्यवहाराची भाषा होत नाही, तोपर्यंत काही होणार नाही. मराठी भाषेवर अधिक संशोधन व्हायला हवे. संत ज्ञानेश्वरांपासून ते तुकोबांपर्यंत मराठीत उत्तम दर्जाचे साहित्य आहे. अतिशय संपन्न असे आपले लोकसाहित्य आहे, परंतु संशोधन कोठे होते आहे? भाषेचा, लोकसाहित्याचा, मध्ययुगीन साहित्याचा अभ्यास करणारे संशोधक दिसत नाहीत. त्यामुळे मराठीची वाईट परिस्थिती आहे. दुसरीकडे पायाभूत आहे ते करायचे नाही. केवळ वरवरचे करायचे, असे सुरू आहे.

**टॉक टाइम**

**मराठीचा वाचकवर्ग कमी होण्यास समाजमाध्यमांचा परिणाम म्हणायचा का?**

माझ्या दृष्टीने एकच परिणाम झाला तो म्हणजे इंग्रजी माध्यमाचा. मराठी विद्यार्थी आता इंग्रजी माध्यमातून शिकतो आणि त्याला मराठी वाङ्मयामध्ये अजिबात गोडी निर्माण होत नाही, त्याचा हा परिणाम आहे. अशी परिस्थिती अकराव्या, बाराव्या शतकात इंग्लंडमध्ये होती. फ्रेंच भाषेतून शिक्षण दिले जात होते. वरिष्ठ वर्ग इंग्रजीतून शिकत नव्हता. . . . . एक क्षण असा आला की, ब्रिटीश माणसाची सांस्कृतिक अस्मिता जागृत झाली आणि ताबडतोब फ्रेंच बंद करून हा समाज इंग्रजीकडे वळाला. हीच अवस्था आज मराठीची आहे. त्यामुळे मराठी माणसाची सांस्कृतिक अस्मिता जागृत झाली पाहिजे.

**समीक्षकांची संख्या कमी होण्याची कारणे काय?**

समीक्षक व्हायचे तर मराठी वाङ्मयाचे अधिकृत, रीतसर असे शिक्षण मिळाले पाहिजे. तुम्ही मराठी विषय घेऊन बीए, एमएचे शिक्षण घेतले पाहिजे. विद्यापीठांमधील मराठी विभाग जवळपास ओस पडलेले. याचे कारण त्यांना नोकरी मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थी कमी येतात. अशा वेळी जे येतात त्यांना पदवी मिळते; परंतु विचार करण्याची शक्ती, वाङ्मयाचा विचार कसा करायचा हे त्यांन कळत नसल्याने समीक्षकच तयार होत नाहीत.

**मराठी भाषेविषयी तुम्ही काय सांगाल?**

संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकोबांपर्यंत मराठीत उत्तम दर्जाचे साहित्य आहे. अतिशय संपन्न असे आपले लोकसाहित्य आहे, परंतु मराठीतील संशोधन कोठे होते आहे. भाषेचा, लोकसाहित्याचा, मध्ययुगीन साहित्याचा अभ्यास करणारे संशोधक दिसत नाहीत. मराठी विद्यार्थी आता इंग्रजी माध्यमातून शिकतो. त्याला मराठी वाङ्मयामध्ये अजिबात गोडी निर्माण होत नाही. त्यामुळे मराठी भाषेची वाईट परिस्थिती आहे. अभिजात दर्जा, मराठी भाषेचे विद्यापीठ यामुळे मराठी भाषेची परिस्थिती बदलेल असे नाही. त्यासाठी मराठी माणसाची सांस्कृतिक अस्मिता जागृत झाली पाहिजे. ही आमची भाषा आहे. ही आमची खाद्यसंस्कृती आहे. ही आमची जीवन पद्धती आहे. आणि ही आम्ही सांभाळली पाहिजे आणि आणखी विकसित केली पाहिजे, हे जोपर्यंत मराठी माणसाला वाटत नाही, तोपर्यंत महाराष्ट्रात बदल होऊ शकत नाही.